MHAH190000312025

**नियमित दिवाणी दावा क्र.११/२०२५**
श्रीधर रोहिदास काकडे
वि.
चंद्रकला कल्याण काकडे व इतर

**<u>आदेश निशाणी क्र.११ खाली.</u>**

१. वादीने प्रतिवादी क्र.२० चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होऊन मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. वादीचे कथन आहे की, प्रतिवादी क्र.२० पार्वतीबाई उर्फ केशरबाई प्रभाकर देवढे या दि. १६/०२/२०२५ रोजी मयत झाली आहे. परंतु, वादी ना कागदपत्रे वेळेत उपलब्ध न झाल्याने सदर मयताचे वारस रेकॉर्डवर घेण्यास विलंब झाला आहे. त्यामुळे वादीने प्रस्तुत अर्ज दाखल करुन विलंब माफ होणेची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले की, वारस रेकॉर्डवर घेण्यास हरकत आहे.

४. दोन्ही पक्षांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. उपलब्ध दस्तांची बारकाईने अवलोकन कले. वादीने अभिलेखावर प्रतिवादी क्र.२० पार्वतीबाई उर्फ केशरबाई प्रभाकर देवढे यांचे मृत्यूप्रमाणपत्राची प्रत दाखल केली. त्यानुसार पार्वतीबाई उर्फ केशरबाई प्रभाकर देवढे यांचे दि.१६/०२/२०२५ रोजी निधन झाल्याचे दिसुन येते.

५. वादीने प्रस्तुतचा दावा वाद मिळकतीचे वाटप व स्वतंत्र कब्जा मिळणेकरीता प्रतिवादी विरुध्द दाखल केला आहे. तसेच प्रतिवादी क्र.२० पार्वतीबाई उर्फ केशरबाई प्रभाकर देवढे याचा मृत्यू दि.१६/०२/२०२५ रोजी झाला. मुदत कायद्यानुसार वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी नव्वद दिवसांचा कालावधी देण्यात आला आहे. प्रस्तुत अर्ज मुदत संपल्यानंतर जवळपास १० महिन्यांनी दाखल करण्यात आला आहे. प्रतिवादी क्र.२० पार्वतीबाई उर्फ केशरबाई प्रभाकर देवढे मयत झाल्या असल्या तरी त्यांच्या वारसाविरुध्द वादीचा दावा दाखल करण्याचा अधिकार टिकुन आहे. तसेच प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास इतर प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दावा परिपूर्ण व गुणवत्तेवर निकाली निघण्यासाठी वारस रेकॉर्डवर घेणे गरजेचे आहे.

त्याचप्रमाणे झालेला विलंब देखील बेसुमार नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

वादीचा निशाणी क्र.११ अर्ज खर्च रक्कम रु.२००/– प्रतिवादीस देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

VAISHALI SANJAY MORE Digitally signed by VAISHALI SANJAY MORE Date: 2026.03.11 17:42:12 +0530

दि.११/०३/२०२६

( वैशाली सं. मोरे)
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर ,
शेवगाव.